# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/११/२०१६

**१)चाकुने जखमी करुन ठार मारले. :—**

दिनांक ३१/१०/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील आरोपी मृतक स्वपनिल आनंदराव भोवते वय ३२ वर्ष रा. मांढळ यांचे सोबत असलेल्या दारू पिण्याच्या जुण्या वादावरून फिर्यादीचे घरासमोर मृतकाच्या शरीरावर चाकुने मारून जखमी करून जागीच ठार मारला व घटने नंतर फिर्यादीस सांगीतल्याने फिर्यादीने घटनास्थळी पाहणी केली असता मृतक हा मृत अवस्थेत पडुन होता असे फिर्यादी शंकर सदाराम राऊत वय ६७ वर्ष. रा. मांढळ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि निंबेकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) दारु विक्री बंदीच्या कारणावरुन घरात घुसुन अश्लिल शब्दात शिविगाळ व जिवे मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ३१/१०/२०१६ रोजी १८.०० वा. दर. यातील फिर्यादी दिलीप जगन वलथरे वय ३८ वर्ष रा. गोंडउमरी हा आपले घरी हजर असतांनी यातील आरोपीतांनी दारू विक्री बंद करण्याचे कारणावरून गैर कायदयाची मंडळी तयार करून फिर्यादीचे घरात घुसुन घरात ठेवलेले बर्तन भांडे व कपडे विस्कळीत करून फिर्यादीचे पत्नीला अस्लिल शब्दात शिविगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १४३,४५२,२९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) घराचा दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन चांदीचे व नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक ३१/१०/२०१६ ते ०१/११/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी हे दिवाळी निमित्त स्व:गावी गेले असता घराचे समोरील दाराचा कोंढा कोणीतरी अज्ञात चोराने तोडुन आत प्रवेश करून लोखंडी आलमारी व प्लायुट आलमारीचे लॉक तोडुन चांदीच्या पायपटया २ नग, चांदीचे कळे २ नग, चांदीचे जोडवे २ नग व नगदी ५०००/—रू. असा एकुण ११,०००/—रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी शांतीलाल निताराम गायधने वय ३५ वर्ष रा. प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) बोरवेल मध्ये लावलेली मोटार पंपची चोरी . :—**

दिनांक २९/१०/२०१६ रोजी ०७.०० वा. ते ३१/१०/२०१६ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादीचे नवीन घराचे बांधकाम सुरू असतांना बोरवेल मध्ये लावुन असलेली १ सबमरसीबल ०.५ एचपी १० स्टेट्स फोर्सवेल आय. एस.आय. कंपनीची मोटार पंप कि. ७,५००/—रू. ची कोणीतरी आात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याने असे फिर्यादी श्रीपाल दौलत तिघरे वय ४२ वर्ष रा. आसगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास नापोशि. चुटे हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन ट्रक लोहयाचे मालासह अफरातफर केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २७/१०/२०१६ ते ०१/११/२०१६ चे रात्र दर. यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीने त्याचेकडे विश्वासाने लोहयाचे १८ बंडल, वजन २१.९६५ टन कि. १२,२०,२७७/—रू. चा माल सनफ्ल्याग कंपनी वरठी येथुन ट्रक क्र. एमएच ३६ एफ १९९९ मध्ये लोड करून मॅपप्रींग इंड्रस्टीज आनंद नगर अमरनाथ मुंबई येथे पोहचविण्यास दिले असता त्यानी तो माल तीथे न पोहचविता सदर ट्रक लोहयाचे मालासह अफरातफर केली व त्यांनी अन्यायाने विश्वासघात करून फसवनुक केल्याने फिर्यादी गुरूदयालसिंग सुरेंद्रसिंग पडड्ा वय ५३ वर्ष रा. गुरूनानक पुरा नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. म्हैसकर पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक ०९/१९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५६ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व ईतर वाहनांवरती ५० केसेस आणि अवैद्य प्रवासी ०१ केस करण्यात आलेल्या आहेत

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.